सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

**********************************************************************************

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कावि/ 138 /2020.
पुणे, दिनांक :- १८ /03/2020.

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेकरिता उपाय योजना

## आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी , आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत .असे प्रवासी पुणे जिल्हयामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तत्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, **मी नवल किशोर राम ,अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे खालीलप्रमाणे पुढील आदेश होईपर्यंत बंदी लागू करीत आहे.**

**१. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे समारंभ, सांस्कृतिक व धार्मीक कार्यक्रम, सण, उत्सव, उरुस, जत्रा ,मनोरंजनाचे कार्यक्रम , क्रिडा व इतर सर्व स्पर्धा इत्यादींना मनाई राहील.**

**२. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारची कृत्ये जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, बैठक, मिरवणुक मेळावे, सभा, आंदोलने, पुणे दर्शनासारख्या सहली, देशांतर्गत व परदेशी सहली इत्यादी यांचे आयोजन तसेच अत्यावश्यक विषयाखेरीज इतर शासकीय बैठकांस मनाई राहील.**

**३. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात असणा-या दुकाने/सेवा आस्थापना, उपहारगृहे/खादयगृहे/ खानावळ, शॉपींग कॉप्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब/पब, क्रिडांगणे, मैदाने ,जलतरण तलाव, उदयाने, सिनेमागृहे, नाटयगृहे, शाळा, महाविदयालये, खाजगी शिकवणी वर्ग ,व्यायामशाळा, संग्रहालये, व्हिडीओ पॉर्लर, ऑनलाईन लॉटरी सेंटर इत्यादी बंद राहतील.**

**४. पुणे जिल्हयातील सर्व परमिट रुम, बिअरबार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्यात येत आहे.**

**५. सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.**

Scanned with CamScanner

## सदरचे आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत.

१. शासकीय /निमशासकीय कार्यालये, सरकारी महामंडळाचे उपक्रम/आस्थापना
२. अत्यावश्यक सेवेतील व्यक्ती , रुग्णालये, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, दवाखाने
३. सर्व प्रकारचे वैदयकिय (ॲलोपथी, आयुर्वेदिक, होमिओपथी इत्यादी ) नर्सिंग कॉलेज
४. रेल्वे स्टेशन, एस.टी.स्टॅण्ड, महानगर परिवहन थांबे व स्थानके , विमानतळ व रिक्षा थांबे इत्यादी
५. अंत्यविधी
६. अत्यावश्यक किराणा सामान, दुध/दुग्धोत्पादने , फळे व भाजीपाला, औषधालये, जीवनावश्यक वस्तु विक्री/वितरीत करण्यास परवानगी राहील.
७. सर्व हॉटेल/लॉज यांना तेथे वास्तव्यास असणा-या ग्राहकांना आरोग्य विषयक आवश्यक ती खबरदारी घेवुन रेस्टॉरंटमध्ये खादयपदार्थ बनवुन देण्यास परवानगी राहील.
८. विदयार्थ्यासाठी खानावळ तसेच महाविदयालय/वस्तीगृह यामधील कॅन्टींग /मेस (केवळ परिक्षार्थी)
९. इ.१० वी व इ.१२ वी तसेच राज्य शासन व केंद्र शासनाकडुन घेण्यात येणा-या सर्व स्पर्धा परिक्षा, विदयापीठ/विश्व विदयालयाच्या परिक्षा देणारे विदयार्थी व संबंधित शैक्षणिक काम पाहणारी व्यक्ती.
१०. ज्या आस्थापना (उदा.माहिती व तंत्रज्ञान उदयोग) ज्यांच्याकडे देश व परदेशातील अति महत्वाच्या ( Critical—National & International Infrastructure) उपक्रमांची जबाबदारी आहे व सदर आस्थापना बंद राहिल्याने अशा उपक्रमांच्या प्रक्रियेला बाधा येवु शकते असे सर्व संबंधित उपक्रम कार्यान्वित राहु शकतील. ( परंतु यादृष्टीने सदर आस्थापना कार्यरत ठेवण्याच्या आवश्यकतेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात विशेषरित्या कळविणे बंधनकारक आहे)
११. प्रसारमाध्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियतकालिके , टिव्ही न्युज चॅनेल इत्यादी) कार्यालय चालु राहतील.

या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी
पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

प्रति,

1. सर्व विभाग प्रमुख---------------------------

प्रत-

1. मा. अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन,महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर
3. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग , मंत्रालय मुंबई यांजकडे
4. आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका
5. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड , पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
6. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,
7. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे

Scanned with CamScanner